## बंदुकीच्या गोळीचा संदेश

*गौरी लंकेश यांची हत्या हा माध्यमांसाठी अनिष्टसूचक संकेत आहे.*

बंगळुरूमधील संतप्त पत्रकार गौरी लंकेश या त्यांच्या घरात जात असताना ५ सप्टेंबर रोजी गोळ्या झाडून त्यांची हत्या करण्यात आली.

या गोळ्यांनी त्यांचा जीव घेण्यापलीकडंही काही गोष्टी साधल्या आहेत. सत्ताधाऱ्यांवर टीका करण्याचा व त्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आपल्याला आहे, प्रभुत्वशाली मतांबाबत भिन्नतादर्शक मतं व्यक्त करण्याचा, सामाजिक विकारांचा तपास करण्याचा आणि उच्चपदस्थांचा भ्रष्टाचार व मानवाधिकार भंगाच्या घटनांना प्रकाशात आणण्याचा अधिकार आपल्याला आहे, अशी धारणा असलेल्या इतर पत्रकारांना आणि टीकाकारांना या मारेकऱ्यांनी संदेश दिला आहे– मुळात एखाद्या मुक्त देशात पत्रकारांनी जे करणं अपेक्षित आहे त्या कृती करणाऱ्यांसाठी हा संदेश आहे.

दलित आणि अल्पसंख्याकांच्या अधिकारांविरोधात सक्रिय असलेल्या प्रतिगामी शक्तींवर लंकेश बेधडक टीका करीत. 'गौरी लंकेश पत्रिके' या कन्नड नियतकालिकातून त्या स्पष्टवक्तेपणानं सत्ताधाऱ्यांवर टीका करत असत. गौरी यांचे वडील पी. लंकेश यांनी 'लंकेश पत्रिके' या नियतकालिकाद्वारे खंबीर, चिकित्सक पत्रकारितेचा पाया घातला. त्यांच्या मृत्यूनंतर गौरी यांनी 'गौरी लंकेश पत्रिके' हे नियतकालिक सुरू केलं. नरेंद्र मोदी सरकार आणि भारतीय जनता पक्ष (भाजप) यांच्यासोबतच कर्नाटकमधील काँग्रेस सरकारच्याही त्या कठोर टीकाकार होत्या. बलशाली प्रादेशिक गटांचं शत्रुत्व त्यांनी पत्करलं होतं आणि सरकार व सत्ताधारी पक्षाला आव्हान देणाऱ्या व्यक्तींना त्या पाठिंबा देत असत. कन्नड लेखक आणि इतिहासकार एम. एम. कलबुर्गी यांच्याप्रमाणे गौरी लंकेश यांना थेट हत्येच्या धमक्या देण्यात आलेल्या नव्हत्या, असं समजतं. लंकेश यांच्याप्रमाणेच कलबुर्गी यांचीही २०१५ साली राहात्या घरामध्ये हत्या झाली होती. त्यांना १९८९ सालापासून हिंदू कट्टरतावाद्यांकडून धमक्या मिळत होत्या.

गौरी लंकेश यांच्या हत्येनं पत्रकार, कार्यकर्ते व मतभिन्नता व्यक्त करणारे यांना धक्का बसला आहे आणि त्यातील अनेक जण भारतभरात निदर्शनं करत आहेत. गौरी लंकेश या विख्यात पत्रकार होत्या. कन्नड नियतकालिक सुरू करण्यापूर्वी त्यांनी इंग्रजी प्रसारमाध्यमांमध्ये काम केलेलं होतं. त्या एका महानगरामध्ये, प्रस्थापित वसाहतीत राहात होत्या; एखाद्या लहानशा शहरात किंवा अलिप्त उपनगरात राहात नव्हत्या. राज्यभरात त्या मोठ्या प्रमाणावर प्रवास करत आणि विविध सामाजिक चळवळींमध्ये सहभागी होत. त्याच वेळी मालक, प्रकाशक व संपादक या नात्यानं साप्ताहिकही प्रसिद्ध करत. दरम्यानच्या काळात त्यांच्यावर अनेक मानहानीचे गुन्हे, अनेक फौजदारी गुन्हे दाखल झालेले होते. यातील दोन गुन्ह्यांमध्ये गेल्या वर्षी त्यांना दोषीही ठरवण्यात आलं. भाजपचे धारवाडमधील खासदार प्रल्हाद जोशी आणि दुसरे एक भाजपचेच नेते उमेश दुशी यांनी दाखल केलेल्या या याचिका होत्या. दोषी ठरवणाऱ्या निकालांविरोधात सत्र न्यायालयात दाद मागण्यासाठीची तयारी लंकेश करत होत्या. त्यांच्या दृश्यमानतेमुळं काही त्यांना मारेकऱ्यांपासून संरक्षण लाभलं नाही. टीकाकारांना केवळ

रोखण्याचीच नव्हे तर नष्ट करण्याची इच्छा बाळगणाऱ्यांना अधिक आत्मविश्वास आणि बेफिकीरी पुरवणारी ही बाब आहे.

गौरी लंकेश यांच्या मारेकऱ्यांनी भारतातील माध्यमांना काही संदेश दिला आहे का? मारेकऱ्यांचे चेहरे समोर येत नाहीत, तोवर घाईगडबडीनं निष्कर्ष काढणं अनुचित ठरेल. तसंही भारतीय माध्यमांमध्ये लंकेश यांच्यासारख्या शूर व्यक्तींची संख्या मोठी आहे असं नाही. अस्वस्थकारक प्रश्न विचारणाऱ्या आणि लोकप्रिय नसलेल्या प्रश्नांशी जोडून घेऊन परिणामांची तमा न बाळगणाऱ्या पत्रकारांची संख्या कमीच आहे. किंबहुना भारतातील मुख्य प्रवाहामधील माध्यम बहुतांशी मान तुकवणारी आणि प्रश्न न विचारणारी आहेत, असं म्हणणं अवाजवी ठरणार नाही, काही मोजके सन्माननीय अपवाद आढळतात. सध्याच्या मालकी रचनेचा विचार करता, मालकांच्या संमतीशिवाय सत्ताधाऱ्यांचा दंभस्फोट करणं व्यक्तिगत पातळीवर पत्रकारांना जवळपास अशक्य बनलं आहे. उद्योगविश्व आणि राजकीय सत्ता यांच्यातील भेदरेषा अधिकाधिक धूसर होत चालली असताना अशी पत्रकारिता आणखीच अशक्य बनते. त्यामुळं, अर्थव्यवस्थेपासून परराष्ट्र व्यवहारांपर्यंत आणि अंतर्गत संघर्षांपर्यंत सर्वच विषयांवर प्रभुत्वशाली कथनाचीच पुनरुक्ती केली जाताना दिसते. निराळा सूर आळवणारं प्रकाशन दुर्मीळ झालं आहे. त्यामुळंच 'गौरी लंकेश पत्रिके'सारखी प्रकाशनं वेगळी ठरतात. ती लहान असतात आणि स्वतंत्र असतात, पण अर्थातच बिनमहत्त्वाची नसतात. माध्यमं व टीकाकारांनी आपल्या आदेशाचं पालन करावं यासाठी सत्ताधारी लाच किंवा सक्ती असे पर्याय वापरत असताना हे लहान आवाजच सर्वांत मोठा बभ्रा करू शकतात. परंतु अशा नियतकालिकांना इतर कोणतंही पाठबळ नसतं, त्यामुळं राज्यसंस्थेच्या बळापासून त्यांना धोका असतो आणि त्यांनी शत्रुत्व पत्करलेल्या राज्यसंस्थे शिवायच्या अन्य घटकांकडूनही त्यांना हानी पोचू शकते.

गौरी लंकेश यांचा आवाज कायमस्वरूपी बंद करण्यासाठी बंदुकीच्या गोळीचा वापर करण्यात आला असला तरी याहून अधिक सरसकटपणे वापरला जाणारा मार्ग मानहानीच्या खटल्याचा असतो. लंकेश यांच्या विरोधातील खटल्यांनी त्यांच्यातील प्रेरणा दडपली नाही, परंतु उद्योग आणि राजकारण दोन्हींमधील शक्तिशाली लोक पत्रकारांविरोधात आणि नियतकालिकांविरोधात या मार्गाचा वापर सातत्यानं करत असतात. या कालबाह्य व धमकावणीचा सूर असणाऱ्या कायद्यासंदर्भातील वाद पुन्हा सुरू करण्याची गरज आहे. या कायद्याला देण्यात आलेलं आव्हान 'सुब्रमण्यम स्वामी विरुद्ध भारत सरकार' या खटल्यात मे २०१६ साली सर्वोच्च न्यायालयानं फेटाळलं. या निकालावर टीका करताना सर्वोच्च न्यायालयातील वकील राजीव धवन यांनी 'द वायर' या संकेतस्थळावर लिहिलं होतं : जग हे सपाट प्रतलावर नाही, तर विषमावस्थेत आहे, त्यामध्ये बलशाली लोक याचिकांच्या मार्गानं लोकांची मुस्कटदाबी करत असतात. याचिकांचा खरा उपयोग हा असा असतो. व्ही. आर. कृष्ण अय्यर यांनी त्यांच्या निकालांमध्ये याची उत्तम मांडणी केलेली आहे. टीकाकारांची मुस्कटदाबी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अशा कायद्याला लोकशाही रचनेमध्ये जागा असता कामा नये. १९८८ साली राजीव गांधी सरकारनं मानहानी विधेयक मंजूर करण्याचा आटापिटा चालवला असताना माध्यमांनी एकत्रितरित्या त्याला विरोध केल्यानं त्यांना हे विधेयक मागं घ्यावं लागलं होतं, हे आपण लक्षात ठेवायला हवं. फौजदारी मानहानीचा कायदा रद्द करण्यासाठी माध्यमांनी एकत्र येऊन लढा देणं, ही गौरी लंकेश यांच्यासारख्या शूर पत्रकाराला वाहिलेली एक प्रकारची आदरांजली ठरेल. त्यांचा क्रूर मृत्यू सर्व पत्रकारांना जाग आणणारा ठरायला हवा. इथं केवळ केवळ त्यांचे जीव धोक्यात आहेत असं नाही, तर मुक्त व निर्भीड पत्रकारितेचं भवितव्यच नष्ट होण्याचा धोका आहे. ●

## असमर्थनीय निर्णय

*निश्चलनीकरणाचा निर्णय चुकीच्या संकल्पनेवर आधारलेला होता आणि रिझर्व बँक व सरकार यांना स्वतःच्या समर्थनार्थ बोलण्यासारखं आता फारसं काही उरलेलं नाही.*

'निश्चलनीकरणा'मुळं 'काळा पैसा' आणि बनावट चलन नष्ट होणार होतं, दहशतवाद्यांचा वित्तपुरवठा थांबणार होता, आणि राष्ट्रातील सर्व भ्रष्ट व वाईट गोष्टी स्वच्छ होऊन निघणार होत्या! नंतर नरेंद्र मोदी सरकारनं असं सांगितलं की, रोखीऐवजी डिजीटल मार्गांनी अधिकाधिक व्यवहार करणाऱ्या अर्थव्यवस्थेकडं प्रवास व्हावा या उद्देशानं हा निर्णय घेण्यात आला आहे. अतिरिक्त रोख रक्कम आणि मोठ्या परिमाणाच्या नोटा यांमुळं भ्रष्टाचाराला चालना मिळते, असं आपल्याला सांगण्यात आलं. निश्चलनीकरणाद्वारे आणखी काही गोष्टी साध्य करायच्या आहेत, असंही सरकारनं नंतर सांगितलं. अनौपचारिक अर्थव्यवस्थेला औपचारिक रूप देऊन करपालन शिस्तबद्ध करण्याचा आपला प्रयत्न आहे, असं सरकारनं सांगितलं. भारतीय रिझर्व बँकेकडं

### The cultural fraternity condemns Gauri Lankesh's murder

Gauri Lankesh, veteran journalist in Kannada and a staunch critic of Hindutva politics, was assassinated by unidentified gunmen at her Bengaluru home on September 5th. As writers, artists and activists committed to the principles of diversity, justice and democracy enshrined in the Constitution, we condemn this political murder in the strongest possible terms.

Lankesh's murder is certainly not an isolated incident. From all indications, it is part of a series of killings meticulously planned and implemented. On 20th August 2013, Dr. Narendra Dabholkar, president of *Maharashtra Andha Shraddha Nirmoolan Samiti*, was shot dead by two 'unidentified gunmen'. Govind Pansare was fatally attacked by gun-wielding assailants on 16th February 2015. He died four days later. A well-known writer in Kannada and former Vice Chancellor of Hampi University, Dr. M. M. Kalburgi, was shot dead on 30th August 2015 at his home in Dharwad. The failure to act against the perpetrators, either out of design or incompetence, has emboldened the perpetrators and their supporters. Today they issue celebratory statements and further threats.

It is not a mere coincidence that these groups or individuals are close to parties whose politics thrive on communal hatred. The modus operandi in all the four cases is exactly the same. All four are associated with similar jubilation in the right wing camp.

The Karnataka government should respond immediately to the people's demand that the murderers of MM Kalburgi and Gauri Lankesh be convicted for their crime without any further delay.

We urge fellow citizens to stand up and speak out against this heinous trend of intimidating and murdering our democratic polity.

**Abhay Kanta**
**Anjum Rajabali**
**Antara Dev Sen**
**Arun Khopkar**
**Ashok Vajpeyi**
**Atamajit Singh**
**Chaman Lal**
**Chandrakant Patil**
**Dalip Kaur Tiwana**
**Danish Husain**
**Ganesh Devy**
**Ganesh Vispute**
**Githa Hariharan**
**Hansda Sowvendra Shekhar**
**Jaya Mehta**
**K. Satchidanandan**
**Kanji Patel**
**Keki Daruwala**
**Kumar Ketkar**
**Laxmi Kannan**
**Maya Krishna Rao**
**Madhav Palshikar**
**Medha Patkar**
**Megha Pansare**
**Prabodh Parikh**
**Pradnya Daya Pawar**
**Rahman Abbas**
**Rajmohan Gandhi**
**Ranjit Hoskote**
**Sanjay Joshi**
**Sanjay Pawar**
**Sanjeev Khandekar**
**Sharada Sathe**
**Shekhar Pathak**
**Sudhakar Yadav**
**Vasant Abaji Dahake**
**Vasudha Dalmia**
**Veera Rathod**
**Vidya Rao**
**Vijaya Chauhan**

परत न आलेल्या पाचशेच्या आणि हजाराच्या नोटा- ज्यांचं मूल्य चार लाख कोटी ते पाच लाख कोटी रुपयांच्या दरम्यान असावं- निष्फळ ठरवल्या जातील, असंही आपल्याला सांगण्यात आलं. ही रक्कम रिझर्व बँक विशेष लाभांश म्हणून सरकारला देईल, आणि त्याचा वापर विकासात्मक खर्चासाठी होईल, असाही अंदाज काही लोकांनी बांधला. काहींनी या निर्णयाला 'मास्टरस्ट्रोक' असं संबोधलं. हे सगळंच चुकीचं होतं.

'तात्पुरत्या अडचणी' सहन कराव्यात, असं आवाहन मोदी सरकार ८ नोव्हेंबर २०१६पासून जनतेला करत आलं आहे. या अडचणींच्या बदल्यात दीर्घकालीन लाभाची आश्वासनं सरकारनं दिली. परंतु हे दीर्घकालीन लाभ अथवा तत्सम कुठलाही परिणाम धूसरच राहिला आहे. या निर्णयामुळं अनेकांना प्राण व उपजीविकेची साधनं गमवावी लागली. सरकारला पटण्याजोगी उत्तरं देता आलेली नाहीत आणि निश्चलनीकरणाचे सकारात्मक परिणाम झाल्याचं सिद्ध करणारा फारसा पुरावाही त्यांच्याकडं नाही. परंतु, निश्चलनीकरणामुळं 'भारतीय अर्थव्यवस्थेला व लोकांना प्रचंड लाभ झाला आहे' आणि या निर्णयासोबतच सेवा व वस्तू करामुळं (जीएसटी : गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स) 'भारतीय अर्थव्यवस्थेचा रचनात्मक व नैतिक पाया बदलला आहे', असा दावा केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली करत आहेत. हा उघडउघड अप्रामाणिकपणाचा प्रकार आहे.

अर्थव्यवस्थेच्या कोणत्याही आकलनाशिवाय निश्चलनीकरणाचा निर्णय घेण्यात आल्याच्या शंकेवर ऑगस्टअखेरीला प्रसिद्ध झालेल्या 'आरबीआय वार्षिक अहवाल २०१६-१७'मध्ये शिक्कामोर्तब करण्यात आलेलं आहे. हा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी केंद्रीय सांख्यिकी कार्यालयानं सकल घरेलू उत्पन्नाचे (जीडीपी : ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट) तिमाही अंदाज प्रसिद्ध केले. या वर्षीच्या एप्रिल-जून या तिमाहीमध्ये जीडीपीची वाढ ५.७ टक्क्यांपर्यंत खाली आली. निश्चलनीकरणानंतर लगेचच्या तिमाहीत- जानेवारी ते मार्च- ही संख्या ६.१ टक्के होती. गेल्या वर्षीच्या एप्रिल-जून तिमाहीत ही वाढ ७.९ टक्के होती. ऑगस्टच्या सुरुवातीला आलेल्या 'आर्थिक सर्वेक्षण २०१६-१७, खंड दोन अनुसार जीडीपी वाढीच्या दरामधील घट ही 'निश्चलनीकरणाच्या आधी झालेली आहे, परंतु निश्चलनीकरणानंतरच्या काळात तिची तीव्रता वाढली.' केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या आकडेवारीनं याला पुष्टी दिली आहे आणि अर्थ मंत्रालयानं ३० ऑगस्टला प्रसिद्ध केलेल्या निवेदनाला या आकडेवारीनं छेद दिला आहे. निश्चलनीकरणानं भारताच्या आर्थिक वृद्धीला बाधा पोचवलेली नाही, असा दावा या निवेदनात करण्यात आला होता. निश्चलनीकरणामुळं मोजावी लागलेली आर्थिक किंमत आता स्पष्ट झाली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या अनौपचारिक क्षेत्रातील सर्वांत गरीब लोकांवर अवाजवी अडचणी लादण्यात आल्या आणि नियमित आर्थिक कामकाज कित्येक महिने अडखळवण्यात आलं. रिझर्व बँकेच्या स्वायत्ततेला कमीपणा आणण्यात आला आणि चलननिर्मितीसाठीही बँकाला मोठा तोटा सहन करावा लागला. शिवाय, निश्चलनीकरणाचा थेट परिणाम म्हणून रिझर्व बँकेकडून सरकारला अतिशय कमी लाभांश मिळाला.

विनिमयातून काढून घेण्यात आलेल्या पाचशे व हजार रुपये मूल्याच्या नोटांपैकी ९८.९६ टक्के नोटा बँकिंग व्यवस्थेत परत आल्या, म्हणजे केवळ १६,००० कोटी रुपये (१.०४ टक्के) परत आले नाहीत, असं 'आरबीआय वार्षिक अहवाल २०१६-१७'मध्ये स्पष्ट करण्यात आलं आहे. याचा अर्थ असा की, बेकायदेशीर रोख रक्कम राखून असलेल्यांची संख्या अत्यल्प होती किंवा ही रक्कम औपचारिक बँकिंग व्यवस्थेमध्ये भरण्याचे मार्ग त्यांनी शोधले होते. यापूर्वी १९४६ आणि १९७८ या वेळी झालेल्या निश्चलनीकरणामध्ये अनुक्रमे १४ टक्के आणि १० टक्के मूल्याचं चलन रिझर्व बँकेकडं परत आलं नव्हतं, हा संदर्भ इथं नोंदवणं सयुक्तिक

ठरेल. सरकारच्या प्रयत्नांचा अपुरा परिणाम झाला आहे, असं सरकारी निवेदनांवरूनच स्पष्ट होतं आहे.

अर्थव्यवस्थेत पुन्हा चलन आणण्यासाठी नवीन नोटा छापण्याकरिता रिझर्व बँकेला ७,९६५ कोटी रुपये खर्चावे लागले. आदल्या वर्षी नोटाछपाईवर झालेल्या खर्चापेक्षा हा खर्च दुपटीहून अधिक होता. भारत सरकारकडं हस्तांतरित करण्यात आलेली अतिरिक्त रक्कम केवळ ३०,६५९ कोटी रुपये होती. आदल्या वर्षीच्या रकमेपेक्षा हा आकडा अर्ध्यापेक्षाही कमी आहे. मुख्यत्वे निश्चलनीकरणामुळं रिझर्व बँकेला कराव्या लागलेल्या वाढीव खर्चामुळं ही रक्कम कमी झाली. निश्चलनीकरणामुळं बँकिंग व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात रोख रक्कम प्रविष्ट झाली, याचा परिणाम म्हणून बँकांच्या रिझर्व बँकेकडील ठेवी वाढल्या. परिणामी व्याजाच्या रूपात रिझर्व बँकेला या बँकांना द्यावी लागणारी रक्कम वाढली.

निश्चलनीकरणाबाबत सकारात्मक परिणामांचा फारसा पुरावा सरकारकडं नाही. भ्रष्टाचार आणि काळा पैसा या समस्या व्यवस्थात्मक आहेत आणि त्यांना संदर्भविहीन पद्धतीनं हाताळण्यात आलं. पुरेशी सल्लामसलत न करता निश्चलनीकरणाची आखणी व अंमलबजावणी करण्यात आली. काळा पैसा आणि त्याच्याविरोधातील लढा हा रोख रक्कमेच्या संदर्भातील नाही, हे अनेकांनी पूर्वीच निदर्शनाला आणून दिलेले आहे. आर्थिक विनिमयांसंदर्भात राज्यसंस्थेकडं नोंदी राहातील, जेणेकरून या व्यवहारांवर आपल्या इच्छेनुसार कर लावण्याची वा देखरेख ठेवण्याची सोय सरकारला राहील, ही बाब काळ्या पैशाच्या बाबतीत महत्त्वाची आहे. यातील काही अंगांवर उपाय करण्याचं आश्वासन जीएसटीच्या रूपात मिळालं आहे. बनावट चलनावरील उपाय निश्चलनीकरणाद्वारे होईल, हा दावाही कमकुवत धोरणनिर्मितीचा दाखला आहे. बनावट चलन हा सतत चालणारा नियामक संघर्ष आहे. त्याला आळा घालण्यासाठी असे एका वेळचे उपाय अपुरेच आहेत. केवळ सततच्या देखरेखीद्वारेच बनावट चलनाला आळा घालता येऊ शकतो. थेट कर परतावा भरणाऱ्यांच्या संख्येत झालेली वाढ, ही एकच सकारात्मक वाटणारी घडामोड आहे. ही एकाच वेळेपुरती वाढ असू शकते, या संदर्भातील पुढील घडामोडींकडं लक्ष ठेवणं गरजेचं आहे. परंतु, भरणा झालेल्या रकमा पाहाता त्यातून महसूल वाढीला फारसा हातभार लागणार नाही.

निश्चलनीकरणाच्या यशाबाबत सरकारनं केलेले दावे दुबळे आहेत आणि त्याचं समर्थन करता येत नाही. निश्चलनीकरणाच्या प्रक्रियेचा भाग म्हणून, किंवा बहुधा यातून जमेल तितकं सावरण्यासाठी, हजारो खात्यांची तपासणी सुरू आहे, बँकांमधील ठेवींची उपलब्ध आकडेवारी तपासली जाते आहे आणि गुन्हेगारांना शोधून शिक्षा केली जाईल, असं सरकारनं म्हटलं आहे. आपला उद्देश साध्य करण्यासाठी सरकारला नोकरशाहीला मुक्त हस्ते कारवाईची मुभा द्यावी लागेल. याचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर होऊ शकतो. खोलवर रुजलेल्या व्यवस्थात्मक समस्यांबाबतचा या सरकारचा अवास्तव एकप्रहारी दृष्टिकोन निश्चलनीकरणाच्या फसलेल्या प्रयोगातून समोर आला आहे. यातून अधिक मर्यादाभंग होईल आणि अधिक मनमानी निर्णय घेतले जातील, परिणामी भारताला आणि भारतीय लोकशाहीला आणखी अडचणींना सामोरं जावं लागेल. ●

*'वाटसरू'ची वर्गणी द्यायची आहे असं नुसतं मनात वाटून उपयोगाचं नाही. त्यासाठी एक पाऊल पुढे टाकावंच लागेल. वर्गणीसंदर्भात आमच्या कार्यालयाशी पुढील क्रमांकावर संपर्क साधा. भ्र. ७७७६९०२२६७*

# पुढच्या वाटचालीसाठीचं एक लहान पाऊल

*तिहेरी तलाक खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयानं संभाव्य स्फोटक क्षेत्र यशस्वीरित्या पार केलं आहे.*

भारतातील मुस्लीम महिलांना लहानसा विजय मिळाला आहे. या विजयाचं श्रेय घेण्यासाठी भारतीय जनता पक्ष (भाजप) पुढं-पुढं करत असला तरी वास्तविक मुस्लीम महिला आणि न्यायव्यवस्था यांनाच याचं श्रेय जातं. या महिलांच्या प्रयत्नामुळंच हा खटला सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोचला. न्यायालयानं त्यांच्या याचिकेला सकारात्मक प्रतिसाद देत 'तलाक-ए-बिद्दत'ची किंवा तिहेरी तलाकची रूढी बेकायदेशीर ठरवली आहे. 'तलाक' हा शब्द तीन वेळा केवळ उच्चारून पती पत्नीला घटस्फोट देऊ शकतो, अशी ही रूढी आहे.

तिहेरी तलाक आणि बहुपत्नीत्वासारख्या इतर भेदभावाधारित रूढी रद्द कराव्यात यासाठी पाच घटस्फोटित मुस्लीम महिला आणि भारतीय मुस्लीम महिला आंदोलन यांनी केलेल्या याचिकांची सुनावणी सर्वोच्च न्यायालयामध्ये सुरू होती. परंतु न्यायालयानं यातील तलाक-ए-बिद्दतच्या मुद्द्यापुरताच निकाल मर्यादित केला. खंडप्राय अशा या ३९५ पानी निकालपत्रामध्ये रोखठोकपणा नाही. पाच न्यायाधिशांनी तीन स्वतंत्र निकालपत्रं सादर केली. न्यायमूर्ती आर. एफ नरीमन व यू. यू. ललित यांचा आणि न्यायमूर्ती कुरियन जोसेफ यांचा तिहेरी तलाक रद्द करण्याविषयाचा निकाल समान असल्यानं तोच अंतिम निकाल ठरला. परंतु, २००२ सालीच शमीम आरा विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार या खटल्यात सर्वोच्च न्यायालयानं ही रुढी बेकायदेशीर असल्याचा निकाल दिला होता, हे इथं नोंदवणं गरजेचं आहे. या आधीच्या निकालाकडं प्रसारमाध्यमं, राजकीय पक्ष व नागरी समाज यांचं फारसं लक्ष गेलं नाही, हे आश्चर्यकारक म्हणावं लागेल.

या विभाजित आणि व्यामिश्र निकालपत्रातील सूक्ष्म मुद्द्यांवर येत्या महिन्यांमध्ये चर्चा आणि विश्लेषण होत राहील. मुस्लिमांमधील रुढी एकसंधपणे सर्व समुदायाला लागू पडणाऱ्या नाहीत, त्यामुळं साहजिकपणे हा निकालही सर्व मुस्लिमांवर परिणाम करणारा नाही. हा मुद्दा अधोरेखित करणं गरजेचं आहे, कारण इस्लामचं पालन करणारा प्रत्येक जण एकाच साच्यात पाहाण्याची वृत्ती असल्याचं दिसतं. विविध युक्तिवाद वापरून देण्यात आलेला हा बहुमताचा निकाल केवळ एका रुढीला बेकायदेशीर ठरवणारा आहे आणि ही रुढी केवळ सुन्नी मुस्लिमांमध्ये पाळली जाते.

सरन्यायाधीश जे. एस. खेहर व न्यायमूर्ती एस. अब्दुल नाझीर यांचा अल्पमतातील निकाल हा याबाबतीतला चिंतेचा घटक आहे. तलाक-ए-बिद्दत हा सुन्नी मुस्लिमांच्या 'वैयक्तिक कायद्या'चा भाग आहे, 'तो त्यांच्या श्रद्धेचा मुद्दा आहे', त्यामुळं 'राज्यघटनेतील कलम २५ अनुसार (या रुढीला) संरक्षण मिळतं', असा निष्कर्ष त्यांनी नोंदवला. 'धर्म आणि वैयक्तिक कायदा' यांना त्या श्रद्धेच्या पालनकर्त्यांच्या आकलनानुसारच स्वीकारायला हवं, असंही मत या न्यायाधीशद्वयानं नोंदवलं. हा निष्कर्ष बहुमताचा निकाल ठरला असता, तर वैयक्तिक कायद्यांमध्ये सुधारणांची मागणी केली जाण्याच्या शक्यताच संपुष्टात आल्या असत्या. शिवाय, वैयक्तिक कायद्यातील कोणतेही बदल न्यायव्यवस्थेनं करायचे नसून संसदेनं करायचे आहेत, असंही प्रतिपादन न्यायाधिशांनी केलं. याचिकाकर्त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांच्या आत कायदा करावा, असे आदेश त्यांनी सरकारला दिले. सुदैवानं ही सूचनाही बंधनकारक नाही. थोडीशी संधी मिळाली असती, तर भाजपनं या अल्पमतातील निकालाचा वापर करून समान नागरी कायदा प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला असता.

आता न्यायालयाचा निकाल आल्यानंतर आपल्याला पुढचा विचार करायला हवा. मुस्लीम

समुदायातील भेदभावाधारित रुढींच्या संदर्भातील खटल्यात मुस्लीम महिलांचं प्रतिनिधित्व करणारी संघटनाच पक्षकर्ती असल्याची ही पहिलीच वेळ आहे. ही महत्त्वाची गोष्ट आहे. १९८५ सालच्या शाहबानो खटल्यापासून असा युक्तिवाद केला जातो आहे की, मुस्लीम वैयक्तिक कायद्यातील बदलाची मागणी त्या समुदायातून व्हायला हवी. (शाहबानो प्रकरणात गुन्हेगारी प्रक्रिया नियमावलीतील कलम १२५ अंतर्गत मुस्लीम महिलेच्या पोटगीचा अधिकार सर्वोच्च न्यायालयानं मान्य केला होता. परंतु मुस्लीम धर्मसत्तेच्या दबावाखाली राजीव गांधी सरकारनं ही सकारात्मक घडामोड हाणून पाडली आणि 'मुस्लीम महिला (घटस्फोटासंदर्भातील अधिकारांचं संरक्षण) अधिनियम, १९८६' लागू केला). समता आणि लिंगभावात्मक न्याय या संदर्भात लढणाऱ्या महिलांच्या गटांनीही मुस्लीम महिलांच्या समस्यांबाबत भिडस्त भूमिका घेतली होती. मुस्लीम महिलांच्या समस्यांचा गाजावाजा करून मुस्लीम समुदायाला मलीन करण्यासाठी हिंदूंमधील उजव्या विचारसरणीचे लोक तयारच असतात, त्यामुळं या संदर्भातील आपल्या स्त्रीमुक्तीच्या प्रयत्नांनी हिंदुत्ववाद्यांना मोकळं रान मिळेल अशी भीती महिला गटांमध्ये होती. या परिस्थितीत गेल्या काही वर्षांमध्ये बराच बदल झाला. मुस्लीम महिला संघटित झाल्या आहेत, आपल्या मागण्या जाहीरपणे व्यक्त करू लागल्या आहेत आणि पुरुषी वर्चस्वाखालील 'अखिल भारतीय मुस्लीम वैयक्तिक कायदा मंडळा'पासून निराळं 'अखिल भारतीय मुस्लीम महिला वैयक्तिक कायदा मंडळ' त्यांनी स्थापन केलं आहे. आपल्या समुदायातील सनातनी नेतृत्वाला नाकारण्यासाठी या महिला आता सज्ज आहेत.

त्याच वेळी हेही लक्षात घ्यायला हवं की, न्यायालयातील विजय म्हणजे मुस्लीम महिलांना लिंगभावात्मक न्याय मिळण्यासाठीच्या दीर्घकालीन संघर्षातील पहिलं पाऊल आहे. न्यायालयात गेलेल्या महिलांनी व्यक्तिगत पातळीवर हिंसाचार व हुंड्याच्या मागण्यांविषयीच्या प्रश्नांना वर्षानुवर्षं वाचा फोडली. हे प्रश्न केवळ मुस्लीम महिलांसमोरचे नसून सर्वच भारतीय महिलांना या प्रश्नांना सामोरं जावं लागतं. सदरहू याचिका विशेषतः मनमानी घटस्फोटाच्या संदर्भात होती, परंतु मुस्लीम महिलांना सहन कराव्या लागणाऱ्या हिंसेचा प्रश्न संपुष्टात आलेला नाही.

देशातील तणावग्रस्त सांप्रदायिक परिस्थिती पाहाता सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधिशांच्या खंडपीठानं संभाव्य स्फोटक क्षेत्र पार करण्यात यश मिळवलं आहे. या निकालानं मुस्लिमांना– विशेषतः महिलांना त्यांच्या वैयक्तिक कायद्यातील इच्छित बदलांसंदर्भातील चर्चा पुढं नेण्यासाठीचा मार्ग खुला होईल, हे महत्त्वाचं. ●

---

## ही सुरुवात आहे, शेवट नव्हे

*प्रतिष्ठा व स्वातंत्र्य यांचा अधिकार व्यक्तीला आहे, यावर खाजगीपणाच्या अधिकारासंदर्भातील निकालानं शिक्कामोर्तब केलं आहे.*

'न्यायमूर्ती के. एस. पुट्टस्वामी विरुद्ध भारत सरकार' या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयातील नऊ न्यायाधिशांच्या खंडपिठानं २४ ऑगस्ट रोजी निकाल दिला. एकविसाव्या शतकातील भारतीय नागरिकांसाठी अधिकारांची नवीन सनदच या निकालानं पुरवली आहे. खाजगीपणाच्या अधिकारासंदर्भातील आधीचा पायंडा बाजूला सारण्यासोबतच नागरी अधिकारांसंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाचे दोन सर्वांत लांच्छनास्पद निकालही ('ए. डी. एम. जबलपूर विरुद्ध एस. एस. शुक्ला' आणि 'सुरेश एन. कौशल विरुद्ध नाझ फौंडेशन') परिणामकारकरित्या रद्दबातल ठरले आहेत. शिवाय राज्यघटनेच्या संदर्भात नागरी-राजकीय अधिकारांचं

प्रगतिशील व अर्थपूर्ण आकलन मांडण्यासाठीचा मार्ग या ताज्या निकालानं मोकळा केला आहे.

या निकालामध्ये खाजगीपणाचा आधार केवळ राज्यघटनेच्या संहितेतून घेण्यात आलेला नाही, तर आंतरराष्ट्रीय कायदा आणि इतर बहुतांश उदारमतवादी लोकशाह्यांमध्ये स्वीकारण्यात आलेल्या व्यापक तत्त्वांचाही आधार या निकालात घेतलेला दिसतो. तंत्रज्ञान आणि शासन यांमधील घडामोडी लक्षात घेता उर्वरित जगाच्या समकक्ष अधिकारांचा न्यायावकाश भारतात आता निर्माण झाला आहे. राज्यसंस्थेनं पाळत ठेवल्यामुळं व्यक्तीच्या मूलभूत अधिकारांवर गदा येते, हा विचार सर्वोच्च न्यायालयानं पूर्वी नाकारला होता ('खडक सिंग विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार' या खटल्यात). परंतु आता अन्याय्य पाळतीच्या सर्व प्रकारांना रद्द करण्यासाठीची परिणामकारक पार्श्वभूमी न्यायालयानं तयार केली आहे. नागरिकांबद्दलची माहिती मिळवण्याचे नवीन मार्ग तंत्रज्ञानानं सरकारांना उपलब्ध करून दिले आहेत, अशा वेळी सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळं लोकशाहीमधील मतभिन्नता व प्रस्थापित मताला असलेला विरोध यांना पाठबळ मिळालं आहे.

अर्थात या निकालाकडं केवळ माहितीचं संरक्षण आणि राज्यसंस्थेची पाळत एवढ्याच मुद्द्यांपुरतं पाहाणं चुकीचं ठरेल. खाजगीपणा म्हणजे केवळ स्वतःविषयीच्या माहितीचं नियंत्रण करण्याचा अधिकार नव्हे, तर शारीरिक स्वायत्तता आणि निवड करण्याचा अधिकारही यात समाविष्ट आहे, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. याद्वारे न्यायालयानं हस्तक्षेपी कृतींना आव्हान देण्यासाठी नागरिकांना एक शक्तिशाली साधन पुरवलं आहे. या निवाड्याचा तत्काळ परिणाम दिसून येईल, विशेषतः समलैंगिकतेला गुन्हा मानणाऱ्या 'भारतीय दंडविधान, १८६०'मधील कलम ३७७ला आव्हान दिलं जाईल. शिवाय, गोमांस आणि दारू यांना स्वतःजवळ ठेवण्यावर बंदी आणणाऱ्या काही राज्य सरकारांच्या क्रूर नियमालाही बहुधा आव्हानं दिलं जाईल. गर्भपात वा सरोगसी यांच्या संदर्भात प्रजननविषयक अधिकारांशी संबंधित कायद्यांवरही याचा परिणाम होईल. उपचारविषयक इच्छापत्र, मानसिक आरोग्य, अपंगांचे अधिकार, आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये याचे पडसाद उमटतील. विशेषतः आपल्या हितासाठी सर्वोत्कृष्ट पर्याय निवडण्याचा अधिकार नागरिकांना न देता आश्रयदातृत्वाच्या भूमिकेतून राज्यसंस्था स्वतःची इच्छा त्यांच्यावर लादते अशा कायद्यांवर याचा परिणाम दिसून येईल.

'आधार (वित्तीय व इतर सवलती, अनुदान व सेवा यांचा लक्ष्यकेंद्री पुरवठा) अधिनियम, २०१६' याला देण्यात आलेलं आव्हान प्रलंबित आहे. अनेक कारणांसाठी 'आधार' अनिवार्य करणारी सूचनापत्रं प्रसिद्ध झालेली आहेत. यावर सदर निकालाचा काय परिणाम होईल, हे तितकंसं स्पष्ट नाही. या कायद्यातील तरतुदींची चाचणी राज्यघटनेतील खाजगीपणाच्या अधिकाराच्या संदर्भात केली जाईल, असे सदर निकालानं स्पष्ट केलं आहे. परंतु, न्यायालयानं या निकालात सहा मतं नोंदवली आहेत. त्यातील एका मतामध्ये असे संकेत दिले आहेत की, कल्याणकारी लाभाच्या तरतुदीसाठी खाजगीपणाच्या अधिकारावर निर्बंध येऊ शकतात. पण, राज्यसंस्थेच्या विश्वसनीय हितसंबंधांसाठीही हा कायदा आणि त्याचा वापर 'न्याय्य, निःपक्षपाती किंवा वाजवी' नाही, असा युक्तिवाद 'आधार'विरोधातील याचिकाकर्ते करू शकतात. याचा अंतिम निवाडा काहीही झाला, तरी 'आधार'च्या बाबतीत राज्यकर्त्यांना अपेक्षा होती त्यापेक्षा जास्त न्यायिक छाननीला सामोरं जावं लागेल अशी तजवीज सर्वोच्च न्यायालयाच्या या ताज्या निकालानं झाली आहे.

परंतु, पुट्टस्वामी खटल्यातील निकालाच्या सकारात्मक परिणामाला गृहीत धरून चालणार नाही. तत्त्वतः मोठ्या घोषणा करून लगेचच 'व्यावहारिक' अथवा तत्सम कारणांमुळं त्या मागं घेण्यात आल्याचे

अनेक दाखले सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायावकाशामध्ये सापडतात. उदाहरणार्थ, श्रेया सिंघल खटल्यामध्ये 'माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २०००'मधील कलम ६६-ए घटनात्मकदृष्ट्या अवैध असल्याचा निर्वाळा न्यायालयानं दिला होता; परंतु हा नियम अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या इतर खटल्यांमध्ये लावण्याबाबत न्यायालयानं सातत्यानं नकार दिला आहे. उलट, राज्यघटनेत उपलब्ध असलेल्या मर्यादित आधारापलीकडं जात या अधिकारावर निर्बंधांसाठी नवीन कारणं न्यायालयानं शोधून काढली आहेत.

सरकारी कामकाजामधील पारदर्शकतेच्या संदर्भात खाजगीपणाच्या दाव्यांना न्यायालयानं मुभा दिली, तरीही या निकालाचा सकारात्मक परिणाम घटेल. सार्वजनिक व्यक्तिमत्त्वं आणि खाजगी व्यक्ती यांच्यासाठी खाजगीपणाची प्रमाणकं भिन्न असतात, हे स्पष्ट करणारं विधिविश्लेषण मोठ्या प्रमाणात झालेलं आहे, पण तरीही सत्तेच्या आणि विशेषाधिकाराच्या स्थानांवर असलेल्यांची गैरवर्तणूक व गुन्हे प्रकाशात आणण्याला बाधा पोचवण्यासाठी या निकालातील ढोबळ तत्त्वांचा वापर केला जाऊ शकतो. परस्परांना छेद देणाऱ्या या दोन चिंताविषयांमध्ये काळजीपूर्वक समतोल साधून व्यापक जनहिताचं रक्षण करण्याची जबाबदारी न्यायव्यवस्थेवर असणार आहे.

भारतीय नागरिक हे राज्यसंस्थेचे अंकित नाहीत, हे राज्यघटनेतील गाभ्याचं तत्त्व पुन्हा प्रतिपादित करण्याचं महत्त्वाचं काम या निकालानं केलं आहे. व्यक्तींना प्रतिष्ठेचं जीवन जगण्याचा आणि पूर्ण क्षमतांनीशी जीवन जगण्याचा हक्क आहे. राज्यसंस्था त्यांना याची मुभा देते, यामुळं नव्हे, तर मानव म्हणून त्यांचा हा अधिकार आहे. व्यक्ती आणि भारतीय राज्यसंस्था यांच्यातील संबंधांची मूलभूत पुनर्रचना करण्याच्या प्रक्रियेचा शेवट म्हणून या निकालाकडं पाहून चालणार नाही, तर या निकालासोबत या प्रक्रियेची सुरुवात झाली आहे, असं म्हणावं लागेल. ●

---

## नापास करून शिक्षणाची हमी मिळेल का?

*शिक्षणाधिकार अधिनियमातील प्रस्तावित बदल मूळ उद्देशाला मारक ठरू शकतो.*

विद्यार्थ्यांना नापास न करण्याचं धोरण मागं घेण्याची तरतूद म्हणजे शालेय शिक्षणातील सुधारणेसाठी एक पाऊल पुढं टाकून दोन पावलं मागं घेण्याचं उत्तम उदाहरण आहे. शिक्षणाधिकार अधिनियमांतर्गत पाचवी ते आठवीच्या वर्गातील मुलांना नापास न करण्याचं धोरण अंमलात आणण्यात आलं होतं, परंतु हे धोरण रद्द करण्यासाठीच्या दुरुस्ती विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळानं अलीकडंच हिरवा कंदील दाखवला आहे. आठवीपर्यंत वार्षिक परीक्षेत विद्यार्थी नापास झाल्यास त्यांना आहे त्याच इयत्तेत थांबवण्याची मुभा राज्य सरकारांना देणारा हा प्रस्ताव आहे. आधीच्याच इयत्तेत थांबवण्यापूर्वी त्यांना परीक्षेची एक संधी दिली जाणार आहे, परंतु नक्की कोणत्या वर्गापासून नापास करण्याचं धोरण लागू होईल हे स्पष्ट करण्यात आलेलं नाही. म्हणजेच शाळाप्रवेशापासूनच मुलांना नापास होऊन आधीच्या वर्गात थांबवलं जाऊ शकतं, असा याचा अर्थ निघतो.

शिक्षणाधिकार अधिनियमाच्या विद्यमान तरतुदींनुसार आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना आपोआपच पुढील वर्गात पाठवलं जातं. 'नो डिटेन्शन पॉलिसी'/ एनडीपी या नावानं परिचित झालेली ही तरतूद शिक्षणाधिकार अधिनियमातील सर्वांत प्रगतीशील घटक आहे, अशी प्रशंसा बहुतांश शिक्षणतज्ज्ञांनी आणि शिक्षकांनी केली होती. परंतु, लोकांमध्ये या तरतुदीविषयी निराळ्या प्रकारची समजूत झाली होती, त्यामुळं त्यावर टीकाही होऊ लागली आणि त्यावरून वाद सुरू झाला. अखेरीस

केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळानं हे धोरण मागं घेऊन केवळ पाचवीच्या इयत्तेपुरतंच ते मर्यादित ठेवलं. विशेष म्हणजे पालकांच्या व शिक्षकांच्या चिंता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे, असं सांगण्यात येत होतं. मुलांकडून- विशेषतः सरकारी शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांकडून शिकलं जात नसल्याच्या 'वार्ता' आल्यावर ही समस्या सोडवण्यासाठी नापास न करण्याचं धोरण मागं घेण्यात आलं.

हे एक सर्वंकष प्रतिगामी पाऊल आहे. याचे परिणाम विद्यार्थ्यांवरही होतील आणि शाळांमधील शिक्षणाचा अर्थ व प्रक्रिया यांच्यावरही होतील. परीक्षेत नापास होण्याला विद्यार्थी जबाबदार असतात आणि शिक्षणातील तफावत भरून काढण्याचा एकमेव मार्ग म्हणजे नापास विद्यार्थ्यांना पुन्हा आधीच्या इयत्तेत शिकायला लावणं, या गृहितकावर हा निर्णय आधारलेला आहे. शालेय शिक्षणाच्या गुणवत्तेविषयी कोणतेही प्रश्न यात उपस्थित केले गेलेले नाहीत. यातून आणखी दोन गृहितकं प्रस्थापित होतात : एक, नापास होण्याची आणि पुन्हा त्याच वर्गात शिकावं लागण्याची भीती विद्यार्थ्यांना अभ्यासाविषयी अधिक गंभीर बनवेल; दोन, आधीच्याच इयत्तेत पुन्हा बसावं लागल्यामुळं शिक्षणावर सकारात्मक परिणाम होतील. नापास केल्यानं आणि पुन्हा त्याच वर्गात बसावं लागल्यामुळं शिकण्यामध्ये सुधारणा होते, हे गृहितक कोणत्याही संशोधनाभ्यासाद्वारे सिद्ध झालेलं नाही. उलट अशा धोरणानं स्व-प्रतिमेला बाधा पोचते आणि विद्यार्थ्यांचं मनोधैर्य खच्ची होतं हे सिद्ध करणारे पुरेसे अभ्यास झालेले आहेत.

सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना भयमुक्त वातावरणात अनिवार्य शिक्षण पुरवण्याच्या प्रयत्नातून शिक्षणाधिकार अधिनियम लागू करण्यात आला होता. शिवाय, प्राथमिक शाळेतच मुलांना शाळा सोडू नये यासाठीची कृती म्हणूनही या अधिनियमाकडं पाहिलं जात होतं. आठवीपर्यंत शालेय स्तरावरच्या परीक्षेत नापास झाल्यावर मुलांना त्याच वर्गात पुन्हा बसवण्याची पद्धत सार्वत्रिकरित्या बंद करून शिक्षणाविषयीचं ध्येय साध्य केलं जाईल, असं मानलं जात होतं. शिवाय, चाचणीचा अर्थ, स्वरूप व रचना बदलली जाईल, असंही वाटत होतं. वार्षिक परीक्षा घेऊन मुलांना पुढच्या इयत्तेत नेणं अथवा नापास झालेल्यांना त्याच वर्गात बसवणं, याऐवजी सातत्यपूर्ण व सर्वांगीण मूल्यांकनाची व्यवस्था आठवीपर्यंतच्या वर्गांसाठी रुजवली जाईल, अशी अपेक्षा होती. याचबरोबर शालेय पातळीवर बोर्डाच्या परीक्षाही नसणार होत्या.

या सर्व तरतुदी खाजगी आणि सरकारी शाळांमध्ये तत्काळ लागू झाल्या. परंतु, शिक्षणाला प्रोत्साहित करणारा प्राथमिक घटक भीती हा आहे, अशी धारणा असलेल्यांना शिक्षण व भय यांच्यात फारकत करणं जड गेलं. वार्षिक शैक्षणिक दर्जा अहवालासारख्या नियमित चाचणी सर्वेक्षणांनी आणखी घबराट निर्माण केली. सातत्यपूर्ण व सर्वांगीण मूल्यांकन आणि नापास न करण्याचं धोरण या समानार्थीच गोष्टी मानल्या जाऊ लागल्या. व्यापक दृष्टिकोन न ठेवता एकतर्फी अर्थ काढले गेल्यामुळं आणखी अनागोंदी निर्माण झाली आणि मुलांचा त्रास वाढला. मुलांना शिकता का येत नाही आणि त्यांचं शिकणं योग्य मार्गानं सादर का करता येत नाही, यामागची कारणं समजून घेणं अवघड नाही. अभ्यासक्रम प्रेरणादायी नसतो, पाठ्यपुस्तकं दुय्यम दर्जाची असतात, शिक्षकांचं पुरेसं प्रशिक्षण झालेलं नसतं आणि पायाभूत सुविधांची दुरवस्था असते, त्यामुळं मुलांच्या शिकण्यावर निःसंशयपणे नकारात्मक परिणाम होतो.

कारण आणि परिणाम यांच्याकडं चिकित्सकपणे न बघितल्यामुळं मुलांच्या शिक्षणविषयक अडचणींवर भाबडे उपाय केले गेले. अशा प्रकारच्या संकुचित आकलनातून निर्माण झालेल्या शिक्षणपद्धतीमध्ये वस्तूकरण, प्रदर्शन व मोजमाप हे सगळंच सुलभ होऊन

**(पान २९ वर)**

वेगळेपणाच्या बाबतीत सांगायचे झाल्यास या साहित्यप्रवाहाने मराठी साहित्याला काही नवे संदर्भ दिले. एक नवा चेहरा दिला हे नाकारता येणार नाही. स्वातंत्र्योत्तर कालखंडात जनमानसामध्ये आलेले आत्मभान, लोकशाही तत्त्वांची होणारी जाणीव, आपल्यावर होत आलेल्या व होणाऱ्या अन्याय अत्याचारांविरोधात आवाज उठवण्याचे निर्माण झालेले बळ इत्यादी बाबी भटक्यांच्या उत्थानासाठी पूरक ठरल्या आहेत असे दिसून येते. भटक्या अवस्थेतून कुठेतरी स्थिरावण्याचा, शिक्षणाकडे जाण्याचा होत आलेला प्रयत्न यातून आस्मिता आणि अस्तित्वाची जाणीव होऊन, स्वत्त्व शोधण्याची प्रेरणा त्यांना मिळू लागली याने एका वेगळ्या प्रवाहाचा जन्म होऊन अनेक प्रतिभावंत हात जागे झाले. त्यातीलच अनेक कवितेचे पेटलेले दिवे समष्टीला उजेड देण्यासाठी जळू लागले. हे जळणे केवळ स्वतःपुरते न ठेवता, समग्र मानव जातीला विशेषतः दीन-दलित, वंचितांना प्रकाश वाटण्याची भाषा जिभेवर घेऊन जळत राहिले.

भटके विमुक्त कवितेवर फुले, आंबेडकरी विचाराचे संस्कार झालेले असल्याने त्यांनी आपल्या कवितेतून, समता, बंधूता आणि मुक्तीचा मार्ग स्वीकारलेला आहे. दुःख, यातना, असह्य वेदना, आणि काळोखात युगायुगांपासून खितपत पडलेल्या भिकार जगण्याला धार देण्याचं युगकर्त्यांचं महत्त्वपूर्ण काम केलं आहे. त्यांनी मुक्या अबोल शब्द देताना आपल्या वेदना संयतपणे मांडून भटके विमुक्तांना जागे केले आहे. आपल्यावर झालेल्या व होणाऱ्या अन्यायाविरूद्ध उठाव करताना कुठेच आक्रस्तळेपणा, उरबडवेपणा येऊ दिला नाही तर हा जो काही संघर्ष आहे तो आमच्या हक्क आणि अधिकारासाठीचा आहे, याची जाण त्यांनी करून दिली. त्यांनी ज्या दुःखाना वाचा फोडली ती तमाम वंचितांची, दीन-दुबळ्या, दलितांची होती. अन्याय झालेल्या माणसांची होती. म्हणूनच भटके विमुक्त कवी सुद्धा त्यांच्याशी बांधील राहून म्हणतात.

*मातीचा गौरव/भूमीची स्तोत्रे/खूप झालीत/आता/ माणसाविषयी लिहिणे आहे.* (आत्माराम कनीराम राठोड, 'आत्माराम कनीराम राठोड यांच्या कविता')

●

---

**(मुलांना नापास... पान १४ वरून)**

जातं. नापास होण्याची भीती नसल्यानं मुलांच्या शिक्षणाला अडथळा होतो, असा समज प्रस्थापित असल्यामुळं मुलांना कालौघात निर्धारित झालेल्या विश्वासार्ह व प्रमाणित मार्गांनी शिकवून (किंवा पाठ करायला लावून) परीक्षेत पास होण्याचं ध्येय समोर ठेवलं जातं, आणि परीक्षेत पास झाल्यावर पुढच्या वर्गात नेलं जातं.

कायद्यातील सदर बदल अंतिमतः मंजूर झाला, तर त्यामुळं सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या वंचित समुदायांमधील विद्यार्थ्यांना शाळांमध्ये अधिक संघर्ष करावा लागेल आणि मानखंडना सहन करावी लागेल. अखेरीस असे विद्यार्थी शाळा सोडून देतील. नापास न करण्याच्या धोरणाचा प्राथमिक उद्देश मुलांच्या शिक्षणाची चाचणी घेणं हा नव्हता, तर किमान आठ वर्षं मुलं शाळेत टिकून राहावीत हा होता. मुलांच्या शैक्षणिक पातळीची चाचणी घेणं, हा निराळा मुद्दा आहे, त्यावरही उपाय करायला हवा आहेच. परंतु, नापास मुलांना एकाच वर्गात ठेवून त्यांचा अवमान केल्यामुळं त्यांचं शिक्षण सुधारेल, अशी अपेक्षा बाळगणं हास्यास्पद आहे. शिवाय, आता बोर्डाची परीक्षाही पाचवीपासून सुरू करण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या चाचणीच्या पारंपरिक व्यवस्थांमुळं केवळ 'घोका आणि ओका' असा नियम असलेली यांत्रिक शिक्षणप्रक्रिया चालू राहाते. ●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे.

(२६ ऑगस्ट, २ व ८ सप्टेंबर या अंकांतून)